उलटतपास प्रतिवादी क्र.२ हिचा वादीतर्फे विधिज्ञ श्री. डी.आर.गोरे यांचेमार्फत शपथेवर सुरु.

८. माझ्या वडीलांचे पूर्ण नाव शंकर परशुराम तावडे असे आहे. माझ्या आजोबांचे नाव परशुराम आबाजी तावडे होते. आम्ही तीन भावंडे आहोत. प्रतिवादी क्र.१ माझा भाऊआहे व प्रतिवादी क्र.३ ही माझी बहीण आहे. प्रतिवादी क्र.१ सध्या हयात नाही. दावा मिळकतीमध्ये आमच्या आजोबांचा हिस्सा १/५ आहे. अन्य चार हिस्सेदार कोण आहेत याची मला माहीती आहे. दावा मिळकतींबाबत वादी, प्रतिवादींमध्ये हद्दीमेरेनिशी वाटप झाले नाही.

९. आम्ही भावंडे, आई, वडील यांचे कायमचे वास्तव्य मुंबईला आहे. आम्हा तिन्ही भावंडांचा जन्म, शिक्षण मुंबईला झाले आहे. दावा मिळकतींमध्ये लागवड करण्यासाठी माझे वडील अगर आम्ही आलेलो नाही. दावा मिळकतीचे ठिकाण धारसज, सातआगा, घरभाट, आडवण ही ठिकाणे मला माहीतीची आहेत. या मिळकतींमध्ये हापूस कलम आंब्याची झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धारसज या मिळकतीमध्ये वादी क्र.१ यांच्या शाखेने ८० हापूस कलमे लावलेली आहेत, वादी क्र.२ च्या शाखेने १०० हापूस कलमे लावलेली आहेत, प्रतिवादी क्र.७ ते १० यांनी ४० हापूस कलमे लावलेली आहेत, प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी ६० हापूस कलमे लावलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सातआगर या जमीनींमध्ये वादी क्र.१ च्या शाखेने ५ हापूस कलमे, वादी क्र.२ च्या शाखेने ११ हापूस कलमे, प्रतिवादी क्र.७ ते १० यांनी ३ हापूस कलमे व प्रतिवादी क्र.११,१२ यांनी ४ हापूस कलमे लावलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घरभाट या जमीनीमध्ये वादी क्र.१ यांनी २० हापूस कलमे, वादी क्र.२ यांनी ४ हापूस कलमे, प्रतिवादी क्र.११,१२ यांनी २ हापूस कलमे लावली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आडवण या जमीनींमध्ये वादी क्र.१ च्या शाखेने २० हापूस कलमे, वादी क्र.२ च्या शाखेने २८ हापूस कलमे, प्रतिवादी क्र.७ ते १० यांनी ८ हापूस कलमे व प्रतिवादी क्र. ११,१२ यांनी ५ हापूस कलमे लावलेली आहेत. टेम, पन्हळी, पन्हळ ही स्थानिक नावे असलेली दावा मिळकती मला माहीतीची आहेत. या तिन्हीही मिळकतींचे

एकक्षेत्रीकरण करुन त्यामध्ये कलमांची झाडे आहेत. या मिळकतीमध्ये वादी क्र.१ शाखेची ५५, वादी क्र.२ शाखेची ७०, प्रतिवादी क्र.७ ते १० यांची ५५, प्रतिवादी क्र.११,१२ यांची ५५ कलम झाडे आहेत. हे प्रत्येकजण आपआपल्या कलमांचे उत्पन्न घेत आहेत. त्यांनी लागवड केलेले क्षेत्र त्यांच्या त्यांच्या हिश्श्यास वाटून देण्यास माझी हरकत नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१० मध्ये वादी आमच्याकडे वाटप सुचवायला आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० मध्ये आम्ही आमचा हिस्सा विकण्याच्या तयारीत होतो.

उलट तपास वादीतर्फे पुर्ण.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे विधीज्ञ श्री. रानडे यांचेमार्फत सुरु</u>—

११. वादीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये मी किती ठिकाणांचा उल्लेख केला हे मला आठवत नाही. मी सांगीतलेल्या ठिकाणांचे सर्वे वर्णन अगर क्षेत्र मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीपैकी कोणत्या ठिकाणच्या जमीनीत कोणत्या वादी, प्रतिवादींची किती झाडे आहेत हे मी सांगू शकत नाही. दावा दाखल करण्यापूर्वी मी व वादींनी मुंबईला बैठक घेतली नाही. मी कैफियत काय लिहावी याबाबत वादीकडून माहीती घेतली नाही.

१२. माझ्या आईचे पूर्ण नाव इंदिरा शंकर तावडे असे होते. ती सन १९८६ साली मयत झाली. माझा जन्म सन १९८५ सालचा आहे. माझे संगोपन प्रतिवादी क्र.३ हीने केले नाही. प्रतिवादी क्र.३ ही माझ्यापेक्षा अंदाजे १० ते १२ वर्षांनी मोठी आहे. दत्तात्रय हरी कांबळी या व्यक्तीस मी व्यक्तीशः ओळखत नाही. दावा मिळकतींचे एकूण अंदाजे क्षेत्र १८ एकर आहे.

प्रश्न— तुम्हास दावा मिळकतीचा खातेक्रमांक सांगता येईल का ?

उत्तर— मला खातेक्रमांक समजत नाही.

दावा मिळकतीचे सातबारा उतारे मी पाहीले आहेत. या सातबारा उता—यावर खातेक्रमांक लिहीलेले आहेत हे माझ्या वाचनात आले का हे मला आठवत नाही.

या सातबारा उता—यामंध्ये आकारणी माझ्या वाचनात आली होती, मात्र ती मला आता आठवत नाही. सदर आकारणी रक्कम तलाठी कार्यालयात जमा करावी लागते याची मला माहीती आहे. मी दावा मिळकतीचे कर स्वत: भरले नाहीत. दावा मिळकतीचे कर किती आहेत याची मी चौकशी केली नाही. दावा मिळकतीपैकी किती क्षेत्रात कलमांची लागवड आहे हे मला आठवत नाही. दावा मिळकतींमध्ये किती वर्षाची किती झाडे आहेत हे मी सांगू शकत नाही. दावा मिळकतीमध्ये कलमांची लागवड करताना मी स्वत: पाहीले आहे. मी स्वत: प्रथम सन २०११ मध्ये दावा मिळकतीमध्ये कलमांची लागवड करताना पाहीले. कलमांची लागवड माझा चुलतभाऊवादी क्र.२ याने केली असे मी प्रथम पाहीले. सन २०११ मध्ये कोणत्या महीन्यात लागवड केली हे मला आठवत नाही. सन २०११ मध्ये मी ७ जानेवारीला आले होते. मी दुस—या किंवा तिस—या दिवशी परत गेले. आंब्याची लागवड मृग नक्षत्र संपल्यानंतर करतात याची मला माहीती नाही. मी जानेवारी मध्ये गावी आले त्यावेळी झाडांची लागवड झाली नव्हती. मी माझ्या डोळयांनी झाडांची लागवड होताना कधी पाहीले ते मला आठवत नाही. दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये कलमांची लागवड केल्याचा उल्लेख आहे, ही लागवड कधी झाली याची माहीती मी घेतली आहे. सदरची लागवड कंत्राटी पध्दतीने एका व्यक्तीला करायला लावली होती व वडीलोपार्जीत मिळकतीपैकी काही मिळकत या कंत्राटदाराला दयायची असे ठरले होते याबाबत मला माहीती मिळाली नाही. तावडे कुटूंबियांखेरीज बाहेरच्या व्यक्तीसोबत या लागवडीबाबत करार झाल्याची माहीती मला मिळाली नाही. वादी, प्रतिवादींनी लागवडीसाठी किती खर्च केला हे मी सांगू शकत नाही. हा लागवडीचा खर्च वादी, प्रतिवादींनी मिळून केला. प्रत्येक शाखेला किती खर्च आला हे मला सांगता येणार नाही. झाड लागवडीसाठी प्रत्यक्ष किती मजूर होते, मजूर कोणत्या गावातील होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, झाडांच्या लागवडीबाबत मला तपशीलवार माहीती नाही. सातआगर या ठिकाणी किती कलमे आहेत हे मला आठवत नाही. अन्य ठिकाणी देखील किती कलमे आहेत हे मला आठवत नाही. कोणत्या ठिकाणी किती लागवड झाली हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी, प्रतिवादी क्र.४ ते २१ यांच्याशी संगनमत करुन मी खोटा जबाब देत आहे.

१३. दावा मिळकतीबाबत खरेदी व्यवहार झाल्याचे मला समजले. या खरेदीखताच्या प्रती मी मिळवल्या आहेत. दोन खरेदीखत झाल्याचे मला समजले. कोणत्या मिळकतीसंदर्भात ती खरेदीपत्र होती हे मला आठवत नाही. या खरेदीपत्रांसंदर्भात हक्कस्थापनेची दाद मी न्यायालयाकडे मागीतली आहे. त्याबाबत मी स्वत: दावा दाखल केला आहे. मी माझ्या कैफियतीमध्ये दि.६/१२/२०१० इ. रोजीच्या मुखत्यारपत्राबाबत कथन केले आहे. मी इंग्रजीमध्ये S.S.Tawade अशी सही करते. दिनांक ६/१२/२०१० इ. रोजीचे मुखत्यारपत्र मी आजतागायत पाहीले आहे. या मुखत्यारपत्राच्या लेखावर माझे छायाचित्र असल्याचे मला आढळले. ते छायाचित्र माझेच होते. त्या मुखत्यारपत्रावर S.S.Tawade अशी सही आढळून आली नाही. त्या मुखत्यारपत्रावर सही शेजारी अंगठयाचा ठसा असल्याचे आढळले. माझा भाऊमयत प्रतिवादी क्र.१ हा माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. माझे व त्याचे संबंध चांगले नव्हते. तो खूप दारु पित होता. मी मूळ मुखत्यारपत्र आजतागायत पाहीले नाही. मी मुखत्यारपत्राची नक्कल पाहीली. सदरची नक्कल तहसिलदार कार्यालयातून मिळाली होती. प्रतिवादी क्र.१ ने मूळ प्रत याकामी हजर करावी अशी मी त्याला नोटीस दिली नाही. या मुखत्यारपत्रामध्ये लिहून देणार म्हणून किती व्यक्ती होते याची मला माहीती नाही. प्रतिवादी क्र.३ चे पूर्वाश्रमीचे नाव भागीरथी शंकर तावडे असे होते. या मुखत्यारपत्रामध्ये मुखत्यारपत्र करुन देणार म्हणून प्रतिवादी क्र.३ चे नाव अनुक्रमांक १ ला आहे. या मुखत्यारपत्रामध्ये माझे नाव किती क्रमांकाला लिहून देणार म्हणून होते हे मला आठवत नाही. मुखत्यारपत्र करुन देणा—या व्यक्तींची ओळख घातल्याचे मला आढळून आले. मी मुखत्यारपत्राची घेतलेली नक्कल आजही माझ्याकडे आहे. सदर नक्कल याकामी दाखल करायला मला अडचण नव्हती.

१४. मुखत्यारपत्राच्या आधारे झालेल्या खरेदीखताच्या नक्कला मी घेतलेल्या आहेत. मी खरेदीखताच्या नक्कला याकामी दाखल केल्या नाहीत.

१५. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी दत्तात्रय कांबळी व सुबोध कांबळी यांच्याशी संगनमत केल्याचे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, एक बोगस व खोटे मुखत्यारपत्र तयार करुन दावा मिळकतीचे बनावट व

खोटे खरेदीपत्र बनवले आहे हे मी खोटे नमूद केले आहे. मी कॅप जेमीनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत जुलै सन २०१० पासुन नोकरी करत आहे. जुलै २०१० मध्ये या कंपनीत स्वॉप्टवेअर इंजिनियर म्हणून माझी नियुक्ती झाली. जुलै २०१० ते सन २०१७ पर्यंत माझ्या कामाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.३० पर्यंत होती. दिनांक ६/१२/२०१० इ. रोजी सोमवार होता. आमची दैनंदिन हजेरी आमच्या कंपनीत नोंद असते. दिनांक ६/१२/२०१० इ. रोजी मी माझ्या कंपनीत काम करत होते हे मला दाखवता आले असते. या कामात मी तसे कागदपत्र दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि.६/१२/२०१० इ. रोजी मी देवगडला आलेच नव्हते हे मी खोटे सांगत आहे. मी मुंबईला आज रोजी ज्या इमारतीत राहते त्या इमारतीत मी सन २००९ पासुन राहत आहे. त्याच इमारतीत माझी बहीण प्रतिवादी क्र.३ राहते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ पूर्वी देखील मी व प्रतिवादी क्र.३ एकाच ठिकाणी राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी मी व प्रतिवादी क्र.३ एकाच इमारतीत राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी राहत असलेली खोली माझ्या वडीलांची आहे. माझ्या म्हणण्यानुसार मी राहत असलेली खोली माझ्या मामाची मुलगी अरुणा तुकाराम गरुडे हिची आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व अन्य प्रतिवादींना सामील होवून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे पूर्ण.

उलट तपासकामी प्रतिवादी क्र.४ ते १२, १८,२०,२१ यांना पुकारता ते गैरहजर. सबब त्यांचेतर्फे उलटतपास नाही असा आदेश करणेत येत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक—११/०४/२०१८

सही/—

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
देवगड.